# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V
Issue I

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

January 2018


A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos


Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

## UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V. H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-V, ISSUE-I

January -2018

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| 1. | वाचन प्रेरणा दिवस ते राष्ट्रीय परिषद | [1]प्रा. विठ्ठल गाईकवाडी<br>[2]प्रा. वसंत गावडे | 1-3 |
| 2. | वाचन व समाज. सहसंबंध | प्रा. डॉ. चंद्रकांत भगवंत पोतदार | 4-6 |
| 3. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | प्रा.शिल्पा अश्विनकुमार पाटील | 7-10 |
| 4. | वाचन संस्कृतीचा विकास | बाळासाहेब शांताराम देविकर | 11-13 |
| 5. | वाचनसंस्कृतीचा विकास होणे काळाची गरज | प्रा. वर्षा अ. तिडके (शनिवारे) | 14-16 |
| 6. | वाचन कौशल्य तंत्र आणि प्रकार | डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 17-20 |
| 7. | वाचनकौशल्य, तंत्र आणि प्रकार वाचकांमध्ये रुजविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका | [1]प्रा. महादेव नागनाथ चव्हाण<br>[2]प्रा. सुधीर रामचंद्र माळी<br>[3]प्रा. श्रीमती ज्योती रमेश यादव | 21-26 |
| 8. | नकाशा वाचनाचे तंत्र व कौशल्य | [1]प्रा. रमेश गोपाळे<br>[2]डॉ. विलास पाटील | 27-32 |
| 9. | वाचनसंस्कृती व माहिती तंत्रज्ञान | कुंडलिक विंधू पारधी | 33-35 |
| 10. | संशोधन कार्यात ग्रंथालयांची बदलती भूमिका | [1]डॉ. एन.एस.गिरी<br>[2]प्रा. दिपाली रामदास चिंचवडे | 36-38 |
| 11. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 39-41 |
| 12. | वाचन संस्कृतीचा विकास | श्रीम. मनिषा प्रकाश वरवडेकर | 42-46 |
| 13. | ग्रंथालयाची बदलती भूमिका-पुस्तकाव गाव | व्यंकट सूर्यवंशी | 47-52 |
| 14. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | वसंत गावडे | 53-57 |
| 15. | माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालयाची भूमिका | सौ. पाटोळे स्मिता प्रकाश | 58-60 |
| 16. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा. अमोगसिद्ध चेंडके | 61-64 |
| 17. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. शैलेंद्र पंढरीनाथ काळे | 65-66 |
| 18. | छात्राध्यापकांचा ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी उपचारात्मक कार्यक्रम व त्याची परिणामकारकता | संध्या गिरीष यादव | 67-72 |
| 19. | वाचन संस्कृती वाढीसाठी ग्रंथालयाची भूमिका | डॉ. आर. एच. थोरवे | 73-76 |
| 20. | कार्ल मार्क्सचे वाचन आणि लेखन | डॉ. घ. ना. पांचाळ | 77-78 |
| 21 | संशोधनातील साहित्य संदर्भाचा अभ्यास | डॉ. एस. के. ढगे | 79-82 |
| 22 | वाचन व तरूण: सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 83-84 |
| 23 | वाचनकौशल्य व वाचनसंस्कृतीचा विकास | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | 85-87 |
| 24 | वाचन कौशल्य : तंत्र आणि प्रकार | गनेश निवृत्ती चौधरी | 88-90 |
| 25 | वाचन व समाज सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. अर्चना कुदळे | 91-93 |
| 26 | संशोधनात ग्रंथालयाचे महत्व | डॉ. सी. पी. हासे | 94-98 |

| | | | |
|---|---|---|---|
| 54 | वाचन संस्कृती विकास आणि ग्रंथालयांची भूमिका | प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे | 188-190 |
| 55 | वाचन संस्कृति और जनसंचार माध्यमों की भूमिका | डॉ. मीना ठाकूर | 191-192 |
| 56 | वाचकांची बदलती अभिरुची | डॉ. बी. डी. गव्हाणे | 193-194 |
| 57 | वाचनाचे महत्व व वाचन कौशल्य | प्रा. अनुराधा वसंत गुजर | 195-196 |
| 58 | वाचनाचे महत्व | प्रा. हारपुडे सुरेखा | 197-199 |
| 59 | वाचन संस्कृती संवर्धनात ग्रंथप्रदर्शनाचे योगदान | [1]डॉ. पांचाळ जी.एन.<br>[2]जाधव मारोती बालाजी | 200-200 |
| 60 | संशोधनात संगणकाचे महत्व | डॉ. पी. व्ही. कदम | 201-204 |
| 61 | वाचन व (आदिवासी) समाजः सहसंबंध आणि वास्तव | प्रा. महादेव रोकडे | 205-206 |
| 62 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. पौर्णिमा कोल्हे | 207-208 |
| 63 | वाचन संस्कृती आणि डिजिटल युग | श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार | 209-211 |
| 64 | वाचन संस्कृती व माहिती तंत्रज्ञान | प्रा. राजेश ल. शिंगडा | 212-214 |
| 65 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | सारिका व्ही. पाटील | 215-217 |
| 66 | वाचन व समाज सहसंबंध आणि वास्तव | श्री. भाईदास शंकर जाधव | 218-220 |
| 67 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. सुवर्णा रा. गाडगे | 221-223 |
| 68 | वाचन संस्कृती और मीडिया का बदलता प्रवाह | प्रा. संध्या तायडे | 224-225 |
| 69 | मानवी जीवनात वाचनाचे महत्त्व | प्रा. संगीता मुंढे | 226-227 |
| 70 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | डॉ. संजय शिंदे | 228-230 |
| 71 | ग्रंथालयात रि-इंजिनिअरिंगची आवश्यकता | प्रा. संजय क्षीरसागर | 231-232 |
| 72 | वाचन चळवळीचा जागर | श्री. सरदार निवृत्ती पाटील | 233-235 |
| 73 | वाचन करताना वाचन संस्कृती जोपासावी | प्रा. डी. आय. शिंगाडे | 236-238 |
| 74 | वाचन संस्कृती काल आणि आज | डॉ. वंदना एव. जामकर | 239-241 |
| 75 | मानवी जीवनात वाचनाचे महत्व | सुस्मिता महादेव वाळके | 242-244 |
| 76 | वाचनसंस्कृती विकास आणि ग्रंथालयशास्त्राची पाच सूत्रे | डॉ. सदाशिव पाटील | 245-246 |
| 77 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा. डॉ. बागूल एम. एस | 247-249 |
| 78 | वाचकांची सौंदर्याभिरूची | डॉ. प्रकाश शिवराळे | 250-256 |
| 79 | बदलते वाचन माध्यम आणि बदलती वाचन संस्कृती | संतोष लिंबराज सास्तुरकर | 257-258 |
| 80 | संशोधनातून साहित्याचे वाचन | [1]विनोद दाजीराम रणपिसे<br>[2]डॉ.एन.बी.शेख | 259-260 |
| 81 | वाचन संस्कृती आणि वर्तमानपत्रे | श्री. गणेश भुळे | 261-265 |
| 82 | सोशल मिडिया वाचक व अभिरूची | प्रा. बाळासो आण्णा सुतार | 266-271 |
| 83 | वाचन संस्कृती व माहिती तंत्रज्ञान | प्रा. गुरूदेव गांगुर्डे | 272-275 |
| 84 | ई पुस्तक प्रकाशन : प्रसिध्द प्रकाशकांमार्फत एक तांत्रिक अभ्यास | प्रा. हितेश गोपाल विजयासी | 276-280 |

# मानवी जीवनातील वाचनाचे महत्व

प्रा . डॉ . वागूल एम . एम
अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय ओतूर ता . जुन्नर जि . पुणे

**प्रास्ताविक:**आपणाला वाचनाने सर्वात ज्ञान मिळत असते . भाषा, इतिहास , भूगोल ,लोकसाहित्य , लोकसंस्कृती प्रदेशातील संस्कृती, निसर्ग, समाजशास्त्र या विषयाच्या अभ्यासात वाचनाला महत्वाचे स्थान आहे . पुस्तके, वर्तमानपत्र, मासिके यांच्या वाचनाने आपल्या ज्ञानात भर पडते . परंतु वाचन कौशल्य ही क्रिया सहजासहजी अवगत न होणारी क्रिया आहे . एखाद्या शब्दाचे अर्थ लावावयाचे असेल तर पुर्वज्ञान, कल्पना हेतू या घटकाचे त्याचे आकलन होते . आपली बौध्दिक पात्रता ,मानसिक घडण ,शारीरिक क्षमता, आजूबाजीचे वातावरण यांचा वाचनक्षमतेवर कमी जास्त प्रमाणात प्रभाव पडत असतो . वाचन म्हणजे छापलेल्या मजकुराचा अर्थ लावणे .

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानच्या युगात तसेच इंटरनेट, वायफाय ,यामुळे वाचन संस्कृतीचा -हास होत असला तरी इंटरनेटच्या माध्यमातून काही वाचक एका क्लिकवर वाचन करताना दिसतात . याचा परिणाम असा झाला की छापील पुस्तके विकत घेऊन वाचकाची संख्या कमी झाली . या धावपळीच्या जीवनातला वाढता कामाचा व्याप असल्यामुळे पुस्तकाशी असलेले नाते दूर होत चालली आहेत . आपण थोर मोठयांची चरित्र, आत्मचरित्र वाचली पाहिजे साने गुरूजी ,प्र . के अत्रे, डॉ . बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले ,म . गांधी ,संत गाडगेबाबा अशी काही महापुरूषांची चरित्र वाचून आपल्या ज्ञानात भर पडत असते .

शालेय पाठ्यपुस्तकांचा वाढता बोजा यामुळे मुलांना अवांतर वाचनासाठी वेळ मिळत नाही . आजची तरूण पिढी ही शोशलमिडिया किंवा नेटवर्किंगच्या इतकी आहारी गेले आहेत . त्यामुळे पुस्तक वाचनाकडे पुर्णपणे दुर्लक्ष झाले आहे . जर आपण पुस्तकांचे वाचन केले आपल्या आयुष्याच्या जडणघडणीत फार मोठा फायदा होतो . 'वाचाल तर वाचाल' या विचारप्रमाणे प्रत्येकांनी वाचनाचे महत्त्व जाणायला हवे .

**संशोधन विषयाचे महत्त्व:** भाषा विचारविनिमयाचे साधन आहे . त्यामुळे वाचन व लेखन या दोन्ही क्रिया महत्वाच्या आहेत . साक्षरतेमध्ये मांगावयाचे झाल्यास वाचन व लेखनाच्या दर्जाला महत्वाचे स्थान आहे . वाचन हे शिकण्याचे आणि व्यक्तिगत आनंद मिळवण्यासाठी साधन आहे असे मला वाटते . किंवा एखादी गोष्ट माहीती करून घेण्यासाठी किंवा अधिक शिकण्यासाठी वाचन आवश्यक आहे . डॉ . रॉबर्ट फिलिप यांनी केलेल्या संशोधनाने मानसिक रूग्णाचा संतुलनाची समस्या असणा-या रूग्णांना औषधांच्या गोळयांपेक्षा कवितांच्या वाचनाने लवकर गुण येतो असे सिध्द झाले आहे . प्रामाणिकपणाच्या जोरावर चांगले प्रशासक व शिक्षक बनायचे असेल तर वाचन कौशल्याशिवाय तरणोपाय नाही . काही वेळा एखादा अधिकारी जेव्हा सही करतो तेव्हा काय लिहिले ते वाचत नाही . 1966 साली कोठारी शिक्षण आयोगात म्हटले होते, की मुले शाळा सोडून जाण्याचे महत्वाचे कारण म्हणजे वाचन कौशल्याची दुर्बलता हे सांगितले . लोकमान्य टिळकांनी असे म्हटले आहे की "स्वर्गात पुस्तकं नसतील तर मला तिथं जाण्यास स्वारस्य नाही . असे वाचनाचे महत्व सांगितले .

वाचनाचा सर्वात मोठा फायदा व्यक्तिगत आनंद वॉल्टर डी ला (Walter de a Mare ) म्हणतात . ज्याप्रमाणे लेखक आपल्या कल्पनेच्या जोरावर प्रतिसृष्टी निर्माण करतो विचारांचे नवनवीन अनुबंध मांडतो त्याप्रमाणे वाचक आपल्या, वाचन कौशल्याच्या जोरावर ती प्रतिसृष्टी, कल्पनाचित्र पुन्हा निर्माण करीत असतो . म्हणून वाचन संस्कार ही काळाजी गरज आहे .

**शोधनिबंधाचा अध्ययन क्षेत्र:** शोधनिबंध लिहिण्यासाठी संशोधन क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे . विषय निश्चितीशिवाय संशोधन कार्य पूर्ण होऊ शकणार नाही याची जाण ठेऊनसी "मानवी जीवनातील वाचनाचे महत्व" हा विषय शोधनिबंध म्हणून निवड केली आहे . कारण समाजातून साहित्य जन्माला येत असते समाजातील, रूढी परंपरा ,रितीरिवाज

,समाजातील प्रश्न , चांगले वाईट अनुभव साहित्य वाचून आपल्याला कळते . म्हणून एक पुस्तक वाचले की पाच वर्षांचा अनुभव मिळतो . साहित्याचा समाजावर परिणाम होतो तसा समाजाचा ही परिणाम साहित्यावर होतो म्हणून वाचक, साहित्य आणि समाज यांचा सहसंबंध आहे असे मला वाटते .

**संशोधन विषयाची मांडणी:** वाचन कौशल्य हे महत्वाचे अभ्यास कौशल्य आहे . आपली बौध्दिक पात्रता मानसिक घडण शारीरिक क्षमता आजूबाजूचे वातावरण यांचा आपल्या वाचनक्षमतेवर कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडत असतो . वाचन ही काही निसर्गदत्त देणगी नसून ते एक कौशल्य आहे म्हणून ते अभ्यासाने प्रयत्न करून आत्मसात करता येते . वाचनाचे प्रकार आणि त्याचे स्वरूप सविस्तरपणे पुढील मांडणी केली आहे . वाचनाचे प्रकार पुढील प्रमाणे

प्रकट वाचन -आपण कधी हळूहळू कधी मोठ्याने कधी सहज वाचन करतो . वाचन करताना ते दुस-याला स्पष्ट रीतीने कळणे म्हणजे प्रकट वाचन होय . लेखकाचे विचार कल्पना व भावना दुस-यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रकट वाचन केले जाते . स्वरांच्या चढउतारासह शुध्द उच्चार करीत श्रोत्यांपर्यंत पोचविले पाहिजे . 1 . प्रकट वाचन हे दुस-याला आनंद देण्यासाठी वाचन करावयाचे असते . हलके फुलके वाचन - हे वाचन आपण नेहमी करीत असतो . कादंबरी, कथासंग्रह, मासिके

अशा प्रकारचे वाचन हे वरवरचे व जलद प्रकारचे असते ते लक्षात राहात नाही अशा वाचनाने मानसिक आनंद मिळतो . प्रकट वाचनात स्पष्ट,शुध्द शब्दोच्चार, आवाजाचे चढउतार, आघात, विरामचिन्ह यांना महत्व असते त्यातून निर्माण होणारी लय ही महत्त्वाची असते . जर छापलेले शब्द मोठ्याने वाचले की त्याचा अर्थ चांगल्याप्रकारे समजतो .

2 . सहेतुक वाचन-यामध्ये आपण सर्व पुस्तक न वाचता काही पाने चाळून आपणास हवी ती माहिती शोधण्यासाठी वाचन करीत असतो आणि आपल्याला माहिती मिळाली की आपले वाचन संपते . 3 . चाळणी वाचन-पुस्तक विकत घेण्यापुर्वी आपण पुस्तकातील अनुक्रमणिका विषयसूची हे पाहून पुस्तक कितपत उपयोगी आहे हे बघून पुस्तक वाचन करीत असतो . 4 . मूकवाचन-मुक वाचन म्हणजे मनातल्या मनात केलेले वाचन होय . हे वाचन स्वतःसाठी असते . यातून अर्थग्रहण व आनंद मिळतो . या वाचनात ओठाच्या हालचाली उच्चारणासाठी लागणारा वेळ व शक्ती खर्च होत नाही . मुक वाचनाने एकाग्रता अधिक येते . मूक वाचनाचा फायदा अभ्यासक, वाचक, लेखक, संशोधक, शिक्षक अशांना होत असतो . मनाची एकाग्रता असल्यास मूकवाचने मजकूर अधिक समजते .

**वाचनाचे स्वरूप**

1 . शब्दबोध-शब्द अचूक वाचून त्याचा अर्थ समजून घेणे . आपण वाचन करीत असताना अक्षर व शब्दबोध होणे आवश्यक आहे . प्रत्येक शब्दाचे अर्थबोध व वेगवेगळे असते . शब्दबोधन हे व्यक्तिसापेक्ष असते . त्यामुळे वेगवेगळे अर्थ लावल्यामुळे शब्दबोधनाचा अर्थ बदलण्याची शक्यता असते . उदा . व ऐवजी व किंवा गाळणी ऐवजी गाळ , गाणी वाग ऐवजी गाग असे शब्दबोधन होऊ शकते . जर आपला वाचनाकडे लक्ष नसेल तर शब्दबोधनावर परिणाम होऊ शकतो .

वाचन दिशा-ज्या वाचकांना वाचनाची सवय नसते . ते पुस्तकावरून उलटसुलट दृष्टी फिरवीत असतात .

3 . पुनर्दृष्टिक्षेप-वाचनाचा सराव नसेल तर त्यामुळे वाचनाच्या वेगावर परिणाम होतो . मनन चिंतनासाठी पुनर्दृष्टिक्षेप उपयोगी पडते .

दृष्टीचा आवाका- आपण वाचन करीत असताना नजरेचा आवाका मोठा असला तर वाचन गती गतीने होते .

एकाग्रता -वाचन करताना एकाग्रता महत्त्वाची असते . वाचन करताना वेगळे विचार असेल वाचनाची गती मंदावते . त्यामुळे अर्थ बोधन होत नाही .

शब्दभांडार-वाचक ज्या भाषेत वाचन करीत असतो . त्या भाषेतील शब्दांचा अर्थ आपणाला माहीत असला पाहिजे . एखादया शब्दाचा अर्थ माहीत नसेल तर आपणास आकलन नीटपणे होणार नाही

आसनव्यवस्था-आपण बसून वाचन करीत असताना पाठीला वाक येणार नाही . याची आपण काळजी घेतली पाहिजे . जर झोपून वाचल्यास वाचनाच्या गतीवर व आकलनावर परिणाम होतो .

आवड-आपण जे वाचतो ते कशासाठी वाचन करीत असतो ते अगोदर ठरविले पाहीजे . आनंद मिळण्यासाठी की परीक्षामध्ये पास होण्यासाठी हे जाणून घेतले पाहीजे .

वाचनाची आवड नसण्याची संभाव्य कारणे-जोडाक्षरांचा योग्य उच्चार करता न येणे, प्रथमिक विद्यार्थी असल्यामुळे त्यांना मराठी वाचता न येणे,विद्यार्थ्यांकडून वर्गात वारंवार वाचन करून न घेणे,घरातील लोकांना वाचनाची आवड नसणे . असे अनेक कारणे न वाचनाची सांगता येतील .

**समारोप:** वाचन ,लेखन व गणित हा पाया पक्का असेल तर माणूस जीवनातील कोणत्याही अडचणींना तोंड देऊन तो जिवनामध्ये यशस्वी होऊ शकतो . आपण ब-याच वेळा शाळेत जाणा-या मुलाला विचारीत असतो " अरे तुला वाचता येते का" वाचन संस्कार हे आपल्या घरातून ही मिळत असते . वाचनापासून मिळालेला फायदा हा व्यक्तिगत न राहता सामाजिक बनतो . समाजातील व्यवहार सुरळीतपणे चालावेत यासाठी प्रत्येक माणसाने शिक्षण घेऊन वाचन केले पाहिजे म्हणजे समाजामध्ये दंगे, अनाचार, गुन्हेगारी वाढीस लागणार नाही . वाचना अभावी जनता योग्य विचार करीत नाही . विकास सुधारणा होणार नाही . म्हणून कायदेची पुस्तके संविधान वाचन केले पाहिजे . आपण साक्षर झालो की वैचारिक स्वातंत्र्य आपणांस मिळू शकते . म्हणून मानवी जीवनातील महत्त्वाचे स्थान म्हणजे वाचन होय .

संदर्भ ग्रंथ .

1 . वाचन संस्कार - सतीश पोरे . पद्मगंधा प्रकाशन ,पुणे 37

2 . व्यावहारिक उपयोजित मराठी आणि प्रसारमाध्ये- डॉ . संपा संदीप सांगळे, डायमंड पब्लिकेशन्स पुणे

3 . व्यावहारिक मराठी -ल . रा . नसिराबादकर

4 . उपयोजित मराठी-प्रा डॉ . संजय संभाजी लांडगे